RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ८(२)] शुक्रवार, फेब्रुवारी ९, २०१८/माघ २०, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.—**शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | पृष्ठ १-३ |

दिनांक १ फेब्रुवारी २०१८ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(माननीय राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक ९ फेब्रुवारी २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६१ चा ५२. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**२.** शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ६ मध्ये, विद्यमान खंड (ख) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९६१ चा ५२.

"(ख) इतर शिकाऊ उमेदवारांच्या बाबतीत, शिकाऊ उमेदवाराचा प्रशिक्षणाचा कालावधी हा, राज्य शिकाऊ उमेदवारी परिषदेकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे असेल ; ".

सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील पोट-कलम (३) मध्ये, विद्यमान परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, जर,—

(क) नियोक्त्याने संविदेच्या अटी व शर्ती पार पाडण्यात कसूर केल्याबद्दल संविदा समाप्त करण्यात आली असेल, तर, शिकाऊ उमेदवार भरपाई म्हणून एक महिन्याचे विद्यावेतन नियोक्त्याकडून मिळण्यास हक्कदार असेल ;

(ख) अशी कसूर शिकाऊ उमेदवाराने केली असेल तर, नियोक्ता प्रशिक्षणाचा खर्च म्हणून एका महिन्याचे विद्यावेतन शिकाऊ उमेदवाराकडून किंवा त्याच्या पालकाकडून मिळण्यास हक्कदार असेल.".

सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये विद्यमान पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आस्थापना, ज्या निर्देशित उदीमांसाठीची किंवा पर्यायी उदीमांसाठीची कार्ये आस्थापनेत पार पाडली जात असतील त्या कोणत्याही निर्देशित उदीमांमध्ये किंवा पर्यायी उदीमांमध्ये, संविदाकृत किंवा रोजंदारीवरील किंवा ज्यांची सेवा त्रयस्थ पक्षकारामार्फत उपलब्ध करून देण्यात आली असेल अशा कर्मचाऱ्यांसह त्या आस्थापनेच्या एकूण कर्मचाऱ्यांच्या संख्येच्या किमान २.५ टक्के आणि कमाल २५ टक्के इतक्या उदीम शिकाऊ उमेदवारांची भरती करील.".

सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये विद्यमान पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

"(१क) दररोज आठ तास प्रशिक्षण घेणाऱ्या उदीम शिकाऊ उमेदवारांना प्रत्येक महिन्यास देय असलेल्या विद्यावेतनाचा किमान दर पुढीलप्रमाणे असेल :—

| | | |
|---|---|---|
| (क) प्रशिक्षणाच्या पहिल्या वर्षाच्या कालावधीत | . . | राज्याने अधिसूचित केलेल्या अर्धकुशल कामगारांच्या किमान वेतनाच्या सत्तर टक्के. |
| (ख) प्रशिक्षणाच्या दुसऱ्या वर्षाच्या कालावधीत | . . | राज्याने अधिसूचित केलेल्या अर्धकुशल कामगारांच्या किमान वेतनाच्या ऐंशी टक्के. |
| (ग) प्रशिक्षणाच्या तिसऱ्या वर्षाच्या कालावधीत | . . | राज्याने अधिसूचित केलेल्या अर्धकुशल कामगारांच्या किमान वेतनाच्या नव्वद टक्के. |

(१ख) दररोज किमान चार तास प्रशिक्षण घेणाऱ्या उदीम शिकाऊ उमेदवारांचे दरमहा विद्यावेतन हे पोट-कलम (१क) च्या अनुक्रमे खंड (क), (ख) व (ग) यांमध्ये नमूद केलेल्या दरांच्या पन्नास टक्के इतके असेल :

परंतु, राज्याने एखाद्या उदीमाचे किमान वेतनाचे दर अधिसूचित केले नसतील तेव्हा त्याबाबतीत, अर्धकुशल कामगारांसाठी राज्याने अधिसूचित केलेल्या अनुसूचित रोजगाराच्या किमान वेतनाची कमाल रक्कम, त्या उदीमाच्या संबंधातील विद्यावेतन देण्यासाठी विचारात घेण्यात येईल :

परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या कलम ६ च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या उदीम शिकाऊ उमेदवारांच्या बाबतीत, राज्य परिषदेने मान्यता दिलेल्या शाळेत किंवा इतर संस्थेत त्यांनी अगोदर घेतलेल्या प्रशिक्षणाचा कालावधी, देय असलेल्या विद्यावेतनाचा दर निर्धारित करण्याच्या प्रयोजनासाठी विचारात घेण्यात येईल. ”.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मध्ये,— सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम २१ ची सुधारणा.

(एक) विद्यमान पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

“ (१क) राज्य शिकाऊ उमेदवारी परिषदेने (केंद्र सरकारने निर्देशित आणि विहित केलेल्या उदीमांखेरीज अन्य) निर्देशित केलेल्या उदीमातील प्रशिक्षण कालावधी यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या शिकाऊ उमेदवारास, राज्य शिकाऊ उमेदवारी परिषदेने निर्देशित केलेल्या ज्या उदीमाचे त्यांनी शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण घेतले असेल त्या उदीमाच्या संबंधात त्यांची कार्यनिपुणता निर्धारित करण्यासाठी राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडून किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर अभिकरणाकडून घेण्यात येणाऱ्या चाचणीस बसता येईल. ”;

(दोन) विद्यमान पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

“ (२क) पोट-कलम (१क) मध्ये निर्दिष्ट केलेली चाचणी उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येक शिकाऊ उमेदवारास, राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडून किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अन्य अभिकरणाकडून त्या उदीमातील कार्यनिपुणता प्रमाणपत्र देण्यात येईल. ”.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.